# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१

संदर्भः रासेयो/ 335 / २०१२

दि. १३ ऑक्टों.२०१२

प्रति
मा.प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय : विद्यापीठस्तरीय शिबिराकरीता स्वयंसेवक पाठविणेबाबत...

महोदय,

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ ऑक्टोंबर ते दि. २ नोव्हेंबर २०१२ दरम्यान सात दिवसीय विद्यापीठस्तरीय शिबिराचे आयोजन मु.पो. सांगवडे, ता. मावळ, जिल्हा पुणे याठिकाणी करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजना संलग्न महाविद्यालयामधील विविध शाखेतील विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उपयोग ग्रामीण विकासासाठी करता येवू शकतो या उद्देशाने **'रासेयोच्या माध्यमातून ग्रामीण विकासात ज्ञानाचे उपयोजन'** शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये पुणे विद्यापीठाच्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांमधून भूगोल, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र व मायक्रोबॉयोलॉजी, पदार्थविज्ञान, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, मराठी इत्यादी विषयांचे मिळून २०० विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. सोबत दिलेल्या यादीप्रमाणे शिबिरातील कामाचे स्वरूप असेल.

तरी आपल्या महाविद्यालयातील दोन स्वयंसेवकांना सदर शिबिरात सहभागी होण्याकरीता **दि. २७ ऑक्टोंबर २०१२ रोजी सकाळी ९.०० वाजता मु.पो. सांगवडे, ता. मावळ, जिल्हा पुणे** याठिकाणी पाठवावे ही विनंती. स्वयंसेवकांनी शिबिरात सहभागी होतांना प्राचार्याच्या सहीने महाविद्यालयाचे संमती पत्र व पालकांचे हमीपत्र, महा. ओळखपत्र, तसेच ७ दिवस मुक्कामाच्या तयारीने गरम कपडे, आंथरूण–पांघरूण, ताट–वाटी, टॉर्च इ.सोबत आणणे आवश्यक आहे. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा प्रवासखर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करावा) **कळावे.**

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक,
रासेयो, पुणे विद्यापीठ

संपर्कासाठी : **प्रा. सविता कुलकर्णी** – ९९२३४२६७७४ **प्रा. बोराटे सुधीर** ७५८८३८२८७०

P.T.O.

सदर शिबिरामध्ये पुणे विद्यापीठाच्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांमधून भूगोल, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र व मायक्रोबॉयोलॉजी, पदार्थविज्ञान, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, मराठी इत्यादी विषयांचे मिळून २०० विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार असून शिबिरामध्ये सर्व शाखेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून खालील स्वरूपाचे काम शिबिरामध्ये होणार आहेत.

१. भूगोल विषयाचे विद्यार्थी दत्तक गावातील जी.आय.एस. व जी.पी.एस. मॅपींग करतील.

२. वनस्पतीशास्त्र विषयाचे विद्यार्थी संबधित गावातील वनस्पतीचे सर्वेक्षण करतील.

३. रसायनशास्त्र विषयाचे विद्यार्थी संबधित गावातील मातीचे परिक्षण करतील.

४. प्राणीशास्त्र विषयाचे विद्यार्थी संबधित गावातील प्राणी, पशुपक्षी, किटकांचे सर्वेक्षण करतील.

५. पदार्थविज्ञान विषयाचे विद्यार्थी संबधित गावातील पारंपारिक व अपांरपारिक उर्जास्त्रोताचे सर्वेक्षण करतील.

६. मानसशास्त्र विषयाचे विद्यार्थी संबधित गावातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची व्यवसाय कल चाचणी घेतील.

७. भूगोल व अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी संबधित गावाचे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे सर्वेक्षण करतील.

८. इतिहास विषयाचे विद्यार्थी संबधित गावाचा इतिहास लिहीतील.

९. मराठी विषयाचे विद्यार्थी संबधित गावाच्या सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करतील.

याप्रमाणे शिबिराचे स्वरूप असून या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील व शहरातील विविध तज्ञ व्यक्ती सर्वेक्षण कसे करण्यात यावे याचे प्रशिक्षण देतील. त्याद्वारे सहभागी विद्यार्थी आपल्या विषयातील ज्ञानाचे उपयोजन दत्तक गावातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिकदृष्टया ग्रमीण विकासासाठी करतील.

P.T.O.

## शिबीरस्थळी येण्याचा मार्ग
## मु.पो.सांगवडे, ता. मावळ, जि.पुणे




टिप :

शिबीर स्थळी जाण्याकरीता दिनांक २७/१०/२०१२ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, सेक्टर नं. २७ प्राधीकरण, पुणे-४४, या ठिकाणाहुन शिबीर स्थळापर्यंत जाण्याची व्यवस्था महाविद्यालया मार्फत करण्यात आली आहे.

महाविद्यालयापर्यंत जाण्याकरीता

स्वारगेट, पुणे स्टेशन, शिवाजीनगर, म.न.पा. या ठिकाणाहुन (पी.एम.पी.एल.) बस उपलब्ध आहे.

दुपारी १२.०० नंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिबीरास्थळी जाण्याकरीता सोमाटणे फाटा येथे पर्यंत जावे. त्या ठिकाणाहून शिबीर स्थळी नेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

सोमाटणे फाटा याठिकाणी जाण्याकरीता स्वारगेट, पुणे स्टेशन, शिवाजीनगर, म.न.पा. व निगडी या ठिकाणाहून तळेगाव दाभाडे, वडगाव मावळ या बसेस मधुन सोमाटणे फाट्यावर उतरणे.

स्वयंसेवकांनी दुपारी १२.०० पर्यंत महाविद्यालयामध्ये उपस्थीत राहण्याचा प्रयत्न करावा.